# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

## अंक - २३

**दिनांक- ०९/०६/२०२५ ते दिनांक- १४/०६/२०२५**

### राजपत्रातील ०६ भाग -

| | |
|---|---|
| भाग - ०१ | बदली / नेमणुक / पदोन्नती |
| भाग - ०२ | रजा / बिनपगारी रजा |
| भाग - ०३ | वेतन / भत्ते / रोखिकरण |
| भाग - ०४ | बक्षिस / मानधन |
| भाग - ०५ | शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती |
| भाग - ०६ | प्रशिक्षण व इतर |

**प्र. पोलीस उप अधिक्षक (मुख्या)**
**पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ**

प्रति,

**प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ -**

सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे **www.yavatmalpolice.gov.in** या अधिकृत संकेत स्थळावर **GAZETTE** या मथळ्याखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक शाखा / पो.स्टे./ उपविपोअ.यांचे **E- Mail** वरती पाठवावे.

प्रत,

नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा, पो.अधि.कार्या. यवतमाळ.

# भाग - ०१

# बदली / नेमणुक / पदोन्नती

6020

क्रमांक :पोअय/आली-८०-सी/पो.शिपाई/अनुकंपा-नियुक्ती/ /२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : - ०९ /०६/२०२५
0 9 JUN 2025

## आ दे श

मा. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/६/२१/अनुकंपा-परिपत्रक/९५/२०२०, दिनांक १६/०२/२०२१ चे अनुषंगाने, महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस अधीक्षक, यवतमाळ या आस्थापनेवर पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरण्याकरिता आयोजीत करण्यांत आलेल्या अनुकंपा पोलीस भरती- २०२२-२०२३ मध्ये उमेदवारांची महाराष्ट्र पोलीस शिपाई ( सेवाप्रवेश ) नियम, २०११ तरतूदीप्रमाणे पोलीस शिपाई (गट -क, अराजपत्रित ) पदाची भरती प्रक्रिया राबवून खालील नमूद अनुकंपा उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम-१९५१ ( महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ (प्रशासन) मधील नियम ३३ मध्ये असलेल्या अधिकारानुसार निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात पुढील आदेशापर्यंत ते कर्तव्यावर रुजू होईल त्या दिनांकापासून **अनुकंपा तत्त्वावर 'पोलीस शिपाई'** या पदावर वेलन संरचना वेतन स्तर एस-७ वेतन संरचना २१७००-६९७०० अधिक विशेष वेतन रु. ७५०/- आणि त्यावर देय असलेले अन्य भत्यासह खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून नियुक्ती देण्यांत येत आहे.

सदर उमेदवारांची जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, यवतमाळ यांचेकडून शारीरिक वैद्यकीय तपासणी करण्यांत आली असता, त्यामध्ये त्यांना योग्य ठरविले तसेच त्यांची चारित्र्य व पुर्वइतिहास पडताळणी संबंधित पोलीस घटकाकडून करण्यांत आली असून **त्यांचेवर भरती पुर्व गुन्हा दाखल असल्याने त्यांचे प्रकरण विभागीय आयुक्त ,अमरावती विभाग अमरावती यांचे अध्यक्षतेखाली पोलीस शिपाई पदावर नियुक्ती करतांना चारित्र पडताळणी उच्च स्तरीय समिती आढावा बैठक दि.२२.४.२०२५ रोजी सपन्न झालेलया बैठकी मध्ये दाखल प्रकरणाचा प्रकरण परत्वे आढावा घेण्यात आला.प्रकरण परत्वे उच्चस्तरीय समितीने कागदपत्रे व न्यायालयानी पारित केलेल्या आदेशांची छानणी केली असता अनुकंपा उमेदवार श्री राम बबन काळे व वासूदेव नामदेव चव्हान हयांना नियुक्ती साठी पात्र ठरविले आहे.**

पोलीस महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस अधिक्षक, यवतमाळ जिल्हयाचे आस्थापनेवर सन-2022-2023 मध्ये घेण्यात आलेल्या अनुकंपा तत्वावरील पोलीस शिपाई भरतींमध्ये अंतिम निवड करण्यात आलेल्या खालील नमुद उमेदवारांची ते वैदयकीय तपासणी व चारित्र्य पडताळणी तपासणीमध्ये पात्र ठरल्याने त्यांची पोलीस शिपाई या पदावर मुंबई पोलीस नियमावली 1959 मधील भाग -1, नियम क्र. 78 चे तरतुदीनुसार अस्थाई व तात्पुरत्या स्वरुपात वेतन संरचना : पीवी-1 वेतन बॅन्ड रुपये 21700-69100 अधिक विशेष वेतन रुपये 750/- आणि त्यावर देय असलेले अन्य भत्ते यामध्ये खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | भरती प्रवर्ग | जात/प्रवर्ग | वेतन | विशेष वेतन | आस्थापनेवरील दिलेला ब.नंबर |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | श्री. राम बबन काळे | अनुकंपा | मातंग/ एससी | 21700/- | 750/- | 976 |
| 02 | श्री वासूदेव नामदेव चव्हान | अनुकंपा | बंजारा/व्हिजे ए | 21700/- | 750/- | 982 |

**सदरची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिन राहील**

महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मुंबई, शासन आदेश क्रमांक : आरसीटी-०३११/प्र.क्र.२२८/ पोल-५ अ दिनांक

१) महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मुंबई, शासन आदेश क्रमांक : आरसीटी-०३११/प्र.क्र.२२८/ पोल-५ अ दिनांक १६/०६/२०११ अन्वये, निर्गमित केलेल्या महाराष्ट्र पोलीस शिपाई ( सेवा प्रवेश ) नियम, २०११ मधील तरतुदीनुसार उमेदवारांची पात्रता कोणत्याही स्तरावर किंवा पडताळणीच्या वेळी नियमानुसार कमी असल्याचे किंवा उमेदवार पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली पात्रता पुर्ण करीत नसल्याचे आढळुन आल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ तरतुदीप्रमाणे राज्य शासनाच्या सेवेत दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या उमेदवारांना नविन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू ठरेल. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन), नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) नियम, -१९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना १९९८ लागु होणार नाही.

३) पूर्व चारित्र्य व वर्तणूक पडताळणी बाबत भरुन दिलेला साक्षांकन फॉर्म मध्ये खोटी माहिती पुरविली आहे किंवा वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे सेवाकाळात कधीही निदर्शनास आल्यास तसेच आपले विरुध्द फौजदारी खटले, न्यायप्रविष्ठ आहेत किंवा नैतिक अध:पतनाच्या गुन्हयात आपणांस दोषी ठरवून न्यायालयाने शिक्षा दिल्याचे किंवा पोलीस सेवेत अभियोग्य नसल्याचे आढळून आल्यास किंवा इतर मार्गाने निदर्शनास आल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता आपली पोलीस शिपाई या पदावरील सेवा समाप्त करण्यांत येईल व आपण कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहाल.

४) आपण सादर केलेली सामाजिक/समांतर आरक्षणासाठी प्रमाणपत्रे जसे, होमगार्ड/माजी सैनिक/ प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त/अंशकालीन/महिला किंवा खेळाडू असल्याचे तसेच जात/प्रवर्ग, शैक्षणिक पात्रता, जन्म तारेखचा दाखला, अधिवास, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे इ. प्रमाणपत्र पडताळणीमध्ये बनावट, असत्य अथवा अवैध असल्याचे आढळून आल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता आपली पोलीस शिपाई या पदाची सेवा समाप्त करुन कायदेशिर कार्यवाही केली जाईल. तसेच तुम्ही दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीमध्ये कोणत्याही प्रकारची तफावत अथवा चुकीची माहिती निदर्शनास आल्यास व जातीची वैधता सिध्द न झाल्यास तुम्हांस कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना अथवा नोटीस न देता पोलीस शिपायाचे सेवेतून कमी करण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

५) तुम्हास देण्यांत आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरती व हंगामी स्वरुपाची असून तुम्हास कोणत्याही प्रकारची पूर्वसुचना अथवा नोटीस न देता सेवेतून कमी करण्यांत येईल.

६) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारास या पदासाठी विहीत केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व संबंधीत **परिक्षा-०४ संधीमध्ये उत्तीर्ण** व्हावे लागेल. जर ०४ संधीमध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाही, तर आपली सेवा समाप्त करण्यांत येईल. या कालावधीत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाहीत.

७) महाराष्ट्र शासन आदेश गृह विभाग क्र. आरसीटी-०३१२/प्र.क्र.२२८, पुनर्बांधणी-१६६/पोल-५-अ, दिनांक २७ जुलै, २०१६ अन्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ मधील नियम ३ (१) (ड)

तरतुदीनुसार अन्य अर्हता पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम-१९८८ मधील कलम २ (२१) नुसार **हलकी वाहने चालविण्याचा (LMV)** परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु, सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे **पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आंत परवाना धारण** करण्यात येईल व या कालावधीत हा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यांत येतील. याबाबतचे बंधपत्र उमेदवारांस नियुक्तीपुर्वी या कार्यालयास भरुन द्यावे लागेल.

<u>८)</u> महाराष्ट्र शासन आदेश गृह विभाग क्र. आरटीसी-०३१२/प्र.क्र.२२८, पुनर्बांधणी-१६६/पोल-५ अ, दिनांक २७ जुलै, २०१६ अन्वये, महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम, २०१६ मधील सुधारित नियम १३ तरतुदीनुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त उमेदवाराने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहीत करण्यात येणारे **संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र** धारण करणे आवश्यक आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार नव्याने नियुक्त होणा-या सर्व कर्मचा-यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल याबाबत बंधपत्र उमेदवारास नियुक्तीपुर्वी या कार्यालयास भरुन द्यावे लागेल.

<u>९)</u> प्रशिक्षणाच्या कालावधीत शिस्त ही अत्यंत उच्च दर्जाची राहील. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे पालन **काटेकोरपणे होईल, यांची दक्षता बाळगावी.** प्रशिक्षण कालावधीत गैरशिस्तीचे वर्तण किंवा असभ्य बर्तण आढळून आल्यास त्वरीत सेवेतून कमी करण्यांत येईल. प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. तसेच सक्षम अधिका-याच्या परवानगीशिवाय मुख्यालय परिसर सोडून बाहेर जाता येणार नाही.

<u>१०)</u> हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधीच्या नियमावलीनुसार, जर त्यांची या परिक्षा अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील, किंवा त्या उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सुट मिळाली नसेल, तर त्यांनी **तदर्थ मंडळाची मराठी/हिंदी विषयाची परिक्षा** विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा तद्नंतर त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखून ठेवण्यांत येतील.

<u>११)</u> शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.(१७/२०००)/ बारा, दिनांक २८ मार्च, २००५ चे **महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५** तरतूदीप्रमाणे आपणांस दिनांक २८ मार्च, २००५ रोजी नंतर किंवा त्यानंतर हयात असलेल्या **अपत्यांच्या संख्येबाबत नमुना-अ नुसार विहीत प्रतिज्ञापन भरुन दयावे लागेल.** तसे हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक आढळून आल्यास राज्य शासकीय सेवेच्या पदासाठी आपणांस अपात्र ठरविण्यांत येवून सेवेतून कमी करण्यांत येईल.

<u>१२)</u> गृह विभाग, शासन पत्र क्र.पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५-अ, दिनांक २६/०९/२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचें पत्र क्रमांक प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली/२०१२/२२२१, दिनांक २३/०४/२०१२ अन्वये, पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास अशा उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसुल करण्यात येईल. प्रशिक्षणावरचा खर्च म्हणून प्रतिमाह रु.२०००/- ( प्रति मासिक रुपये दोन हजार फक्त ) इतका प्रशिक्षणावरील खर्च म्हणून वसुल करण्यात येईल. तसेच शासकीय सेवेचा राजीनामा स्विकारण्यासंबंधात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.

एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.-३३/९२/८, दिनांक ०२ डिसेंबर, १९९७ मधील सर्वसाधारण मार्गदर्शक सुचनेप्रमाणे तरतुदी बंधनकारक राहील.

१३) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३ (२)(अ) उपखंड (अ) च्या अधिनतेने पोलीस शिपाई पदावर नियुक्ती केलेला कर्मचारी, त्यांच्या विनंतीनुसार, त्यांच्या नियुक्तीच्या पोलीस घटकातून तो इतर पोलीस घटकात बदलीसाठी, बदलीची पात्रता, बदली प्रक्रिया, सक्षम प्राधिकारी, सेवाजेष्ठता व इतर अटींसंदर्भात महाराष्ट्र शासन, गृह विभाग, क्र. संकिर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५-ब, दिनांक २६ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये मान्यता देण्यांत आलेली महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरिक्षक (रा.रा.पो.बल गटातील कर्मचारी वगळता) दर्जापर्यतच्या पोलीस कर्मचा-यांच्या घटक आस्थापना बदली नियमावली-२०१७ अन्वये निर्गमित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून पात्र राहील.

१४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ अन्वये, सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे, अशा उमेदवारास त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यांत येत आहे.

नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महीन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समिती कडून करुन घेणे आवश्यक आहे. उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी ऑनलॉईन प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास न चुकता सादर करावी. जात पडताणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले. तर आपणांस दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल. आणि आपले विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विषेष मागास प्रवर्ग ( जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० मधील नियम १० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यांत येईल.

१५) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग, क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ तरतूदीप्रमाणे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी उन्नत व प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबत तहसिलदार व नायब तहसिलदार यांच्या प्रमाणपत्राच्या आधारे ज्या महिलांना आरक्षणाचा लाभ देण्यांत आला आहे, त्यांची प्रमाणपत्रे आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचेकडून प्रमाणपत्र पडताळणी करिता प्रस्ताव एक महिन्याचे आत सादर करावा. सदरचे प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिनतेने उमेदवारास तात्पुरती नेमणूक देण्यांत आलेली आहे. संबंधीत उमेदवारांचे सवलतीचे प्रमाणपत्र अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१६) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम, १९५१, मुंबई पोलीस मॅन्युअल-१९५९, मुंबई पोलीस (शिस्त व अपील) नियम, १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागू होतील.

१७) पोलीस शिपाई या पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांची सेवाजेष्ठता तसेच आंतरीक सेवाजेष्ठता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्थायी आदेश क्र. २२/२०१३, जावक क्रमांक पोमसं/६/१०/पोशि.-भरती/ सेवाजेष्ठता/२५१/२०१२, दिनांक १७/०८/२०२१३ तरतुदीप्रमाणे पोलीस भरतीच्या वेळी घेण्यात आलेल्या परिक्षेत उमेदवाराने प्राप्त केलेल्या गुणांच्या, गुणवत्तेच्या क्रमानुसार पोलीस शिपाई संवर्गातील कर्मचा-यांची सेवाजेष्ठता

निश्चित करण्यांत येईल. तसेच ज्या उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले असेल तर, त्यांच्या जन्मतारखेनुसार ( वयाने जेष्ठ असलेल्यांना अग्रक्रम देवून ) सेवाजेष्ठता लावण्यात येईल.

१८) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर पाण्यात पोहता येणे आवश्यक असल्याने पोहण्याचे प्रशिक्षण घ्यावे लागेल.

१९) शासकीय सेवेत रुजु झाल्यानंतर उमेदवारास भारतीय संविधाना प्रती निष्ठा व गोपनियतेची शपथ घ्यावी लागेल.

२०) आपणांस पोलीस अधीक्षक,यवतमाळ या आस्थापनेवरील देण्यांत आलेला बक्कल नंबर सर्व प्रकारचा पत्रव्यवहार / विनंती अर्ज करतांना, पत्रव्यवहारात दिलेल्या बक्कल नंबरचा उल्लेख व वापर करण्यात यावा.

२१) आदेश मिळताच आपण राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ यांचे कार्यालयात तात्काळ हजर व्हावे. यापुर्वी कोणत्याही सेवेत नोकरी करीत असल्यास नोकरी सोडण्यासाठी करावयाचे कार्यवाहीकरिता पुरेसा अवधी म्हणून १० दिवस कालावधी देण्यात येत आहे. सदरचा विहीत मुदतीचा कालावधी संपल्यानंतर आपणांस पोलीस शिपाई पदावर रुजू करण्यांत येणार नाही, हयाची नोंद घ्यावी.

२२) उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी कराव्या लागणा-या प्रवासासाठी प्रवास भत्ता मिळणार नाही.

( कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

प्रति,

सर्व संबंधित उमेदवार

१. उमेदवाराने ताट, वाटी, ग्लास, टिफीन, बकेट, मग, आंथरुण, चादर, पुरेशे कपडे व आपणास आवश्यक असलेले इतर दैनंदिन वापराचे साहित्य खरेदीसाठी पुरेसे पैसे स्वत:कडे ठेवावेत. तसेच मेस अग्रीम रु. ३०००/- पोलीस मुख्यालय,यवतमाळ येथे जमा करण्याकरीता सोबत आणावेत.

प्रत :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ

२. आदेशात नमुद उमेदवार हे पोलीस मुख्यालयात उपस्थित झाल्यावर त्यांना हजर करुन त्यांचा हजर झाल्याचा दिनांक या कार्यालयास तात्काळ कळवावा. पुरुष व महिला उमेदवारांची निवास व्यवस्था वेग-वेगळी व सुरक्षित करावी. देखभालीकरिता वार्डन म्हणून पुरुष/महिला कर्मचारी नेमावेत. तसेच उमेदवारांना नियमानुसार सरंजाम व किट साहीत्य पुरवावे. उमेदवारांकडून मेस अग्रीम रु. ३०००/- ( अक्षरी तीन हजार फक्त) स्विकारुन ती रक्कम मेस अग्रीम करिता जमा करावी. त्यांचे साडेपाच महिन्याचे मुलभूत प्रशिक्षण पोलीस मुख्यालय येथे (ईन-डोअर व आऊट-डोअर) तात्काळ सुरु करावे. तसेच त्यांचे प्रोग्रेस शिट तयार करुन नमुद सर्व बाबींचा अनुपालन अहवाल सादर करावा.

३. वरील पोलीस शिपाई या पदावर भरती झालेले उमेदवार यांना त्यांचे सेवापट तयार करण्यासाठी ०२ पासपोर्ट साईज गणवेशातील फोटोसह त्यांना पोलीस अधीक्षक,यवतमाळ कार्यालयातील आस्थापना शाखेत ( कक्ष-९) कार्यालयीन वेळेत कवायत निर्देशक सोबत पाठविण्यात यावे.

प्रतिलिपी :-प्रमुख लिपीक लेखाशाखा/ कक्ष-२४ (NPS PAY)/ लेखाशाखा, पो.अ.कार्यालय,यवतमाळ (२ प्रतीत)

क्रमांक:पोअय/कक्ष-९/२४४४/बदली/ 6072 /२०२
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :१०.०६.२०२५ 11 JUN 2025

**कार्यालयीन आदेश**

**पोशि/2444 सतिश बहादुरे** नेमणूक.पो.स्टे.नेर यांची प्रशासकिय कारणास्तव **पो.स्टे खंडाळा येथे त्वरित प्रभावाने** बदली करण्यात येत आहे. त्यांना तात्काळ रवाना करण्यात यावे.

**(कुमार चिंता)**
पोलीस अधिक्षक यवतमाळ

प्रति,

ठाणेदार नेर/ ठाणेदार खंडाळा यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस

प्रतीलीपी :-कक्ष-१४ डीपीजी लिपीक/वेतन लिपीक-१ यांना आवश्यक कार्यवाहीस

# भाग - ०२

# रजा / बिनपगारी रजा

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस<br>सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ**<br>एल.आय.सी.चौक, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ<br>पिन कोड - ४४५००१<br>ई मेल - sp.yavatmal@mahapolice.gov.in | स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५० |
| | | यवतमाळ दि. 11 JUN 2025 |
| जा.क्र.:- पोअय/कक्ष-३/मो.परिवहन/प्रसाधनगृह /२०२५ 6048 | | |

**-: आदेशः-**

खालील नमुद प्रमुख लिपीक यांनी रजेची मागणी केल्यप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **अर्जीत रजा शासकीय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | प्रमुख लिपीक यांचे नाव पदानाम | रजा कालावधी | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुभाष जाभोरे प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा/अति.कार्य.विभागीय चौकशी शाखा | दि.१०.०६.२०२५ ते १३.०६.२०२५ पर्यंत एकुण ०४ दिवस | श्री .विनोद झाडे प्रमुख लिपीक प्रबंधक शाखा |

( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशा न्वये)

**( सुशिला पवार )**
**कार्यालय अधिक्षक**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**प्रति,**

**उपरोक्त नमुद संबधित प्रमुख लिपीक**

पतः- पोलीस उप अधीक्षक ( मुख्या)/कार्यालय अधीक्षक/कक्ष-१४ यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस

कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ
एल.आय.सी.चौक, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ
पिन कोड - ४४५००१
ई मेल - sp.yavatmal@mahapolice.gov.in


जा.क्र.:- पोअय/कक्ष-११/किरकोळ रजा /२०२५ 6107 यवतमाळ दि. 12 JUN 2025

-: आदेश:-

खालील नमुद प्रमुख लिपीक यांनी रजेची मागणी केल्यप्रमाणे त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **किरकोळ रजा शासकीय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | प्रमुख लिपीक यांचे नाव पदानाम | रजा कालावधी | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|
| १ | श्री.विनोद झाडे प्रमुख लिपीक प्रबंधक अति कार्य.पत्रव्यवहार शाखाख्अति.कार्य.विभगीय चौकशी शाखा | दि.१२.०६.२०२५ व १३.०६.२०२५ पर्यंत एकुण ०२ दिवस | श्री .ताराचंद धारगावे प्रमुख लिपीक आस्थपना शाखा |

( मा.पोलीस उप अधीक्षक यांचे आदेशा न्वये)

( सुशिला पवार )
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ

प्रति,

उपरोक्त नमुद संबधित प्रमुख लिपीक

पत:- पोलीस उप अधीक्षक ( मुख्या)/कार्यालय अधीक्षक/कक्ष-१४यांना माहितीस व योग्य कार्यवाहीस

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)/सिक कालावधी/ 6116 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 12 JUN 2025

## आदेश

चापोशि/1339 सचिन अनिल नारखेडे, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ हे दि.05/05/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 38 दिवस वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.11/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात आले आहे.

तसेच त्यांनी वैद्यकिय कारणास्तव उपभोगलेला कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-1981अन्वये,असाधारण रजा नियम (63) अन्वये,खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो अं यांचे नाव व पदनाम | एकुण दिवस | मंजुर रजेचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | चापोशि/1339 सचिन अनिल नारखेडे, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ | 38 दिवस | दि.05/05/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 38 दिवस असाधारण रजा (बिनपगारी रजा) मंजूर करण्यात येत आहे. |

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव

प्रत:- चापोशि/1339 सचिन अनिल नारखेडे, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ

मार्फत:- पोलीस निरीक्षक,मोटर परिवहन विभाग,यवतमाळ.

क्रमांक:पोअप/कक्ष-9(3)/सिक कालावधी/6115 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 12 JUN 2025

आदेश

चापोहवा/1010 विजय माणिकराव केराम, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ हे दि.05/05/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 38 दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.11/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञाकिंत कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात आले आहे.

तसेच,त्यांनी वैदयकिय कारणास्वत उपभोगलेला कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा)नियम-1981, परीवर्तीत रजा नियम (61) व नियम (50)अन्वये,अर्जित रजा खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो अं यांचे नाव व पदनाम | एकुण दिवस | मंजुर रजेचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | चापोहवा/1010 विजय माणिकराव केराम, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ | 38 दिवस | दि.05/05/2025 ते दि.19/05/2025 पर्यंत 15 दिवस परीवर्तीत रजा |
| | | | दि.20/05/2025 ते दि.11/06/2025 पर्यंत 23 दिवस अर्जित रजा |

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,
कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव
प्रत:- चापोहवा/1010 विजय माणिकराव केराम, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ.
मार्फत:- पोलीस निरीक्षक,पो.स्टे.मुकुटबन

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)/सिक कालावधी/ 6118 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 12 JUN 2025

## आदेश

ग्रेडपोउपनि/1175 निलेश विलासराव जेकब, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ हे दि.16/04/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 57 दिवस वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.11/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञाकिंत कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात आले आहे.

तसेच त्यांनी वैद्यकिय कारणास्तव उपभोगलेला कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम-1981अन्वये,असाधारण रजा नियम (63) अन्वये,खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पो अं यांचे नाव व पदनाम | एकुण दिवस | मंजुर रजेचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | ग्रेडपोउपनि/1175 निलेश विलासराव जेकब, नेमणुक-मो.पं.वि यवतमाळ | 57 दिवस | दि.16/04/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 57 दिवस असाधारण रजा (बिनपगारी रजा) मंजूर करण्यात येत आहे. |

Kumar

( कुमार चिंता )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति

कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव
प्रत:- GPSI/1175 निलेश विलासराव जेकब, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ.
मार्फत :- पोलीस निरीक्षक,मोटर परिवहन विभाग,यवतमाळ

## भाग - ०३

# वेतन / भत्ते / रोखिकरण

क्रमांक:पोअय/कक्ष-९(१)/से नि.४३३ रजा रो. / 6049 /२०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :३.३.२०२५ 11 JUN 2025

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम ६८ मधील तरतुद, वित्त विभागाचे शासन निर्णय परिपत्राक क्रमांक.अ.रजा/२४०/८/सेवा-९ दिनांक १५.०१.२००१ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सेवानिवृत्ती / दिनांकास त्यांचे खाती शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्यास मंजुर देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त दिनांक | शेवटचे वेतन ७ वे.वेतन आयोग प्रमाणे | शिल्लक रजा | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सपोउपनि/४३३ राजेश सदाशिव गवळी | दि. ३०.०५.२०२५ | ५२६००/- | ३०० दिवस | पो.मु.यवतमाळ |

उपरोक्त नमुद नियत वयोमाण सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदार यांना शिल्लक अर्जित रजेची रोख सममुल्य रक्कम सन 2025-2026 या वित्तीय वर्षातील लेखाशिर्ष 2071 निवृत्ती वेतनाचे लाभ अर्जीत रजेची रोखीकरण या शिर्षाखाली अनुदानातुन भागविण्यात व खर्च करण्यात मंजुरी देय आहे.

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

**प्रति**

वेतन लिपीक कक्ष-१८( दोन प्रति ) पेन्शन लिनीक कक्ष-१६
राजपत्र लिपीक कक्ष-१४ यांना योग्य कार्यवाहिस्त्व.

**प्रतः-** जिल्हा कोषागार अधिकारी यांना माहितीस सादर

क्रमांक:पोअय/कक्ष-९(१)/से नि.४६ रजा रो. /6050/२०२५
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :३.३.२०२५

11 JUN 2025

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम ६८ मधील तरतुद, वित्त विभागाचे शासन निर्णय परिपत्राक क्रमांक.अ.रजा/२४०/८/सेवा-९ दिनांक १५.०१.२००१ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे सेवानिवृत्ती / दिनांकास त्यांचे खाती शिल्लक असलेल्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्यास मंजुर देण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव पदनाम व ब.नं. | सेवानिवृत्त दिनांक | शेवटचे वेतन ७ वे.वेतन आयोग प्रमाणे | शिल्लक रजा | नेमणुक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सपोउपनि/४६ नरेंद्र नथ्थूजी बगमारे | दि. ३०.०५.२०२५ | ५११००/- | ३०० दिवस | यवतमाळ शहर |

उपरोक्त नमुद नियत वयोमाण सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदार यांना शिल्लक अर्जित रजेची रोख सममुल्य रक्कम सन 2025-2026 या वित्तीय वर्षातील लेखाशिर्ष 2071 निवृत्ती वेतनाचे लाभ अर्जीत रजेची रोखीकरण या शिर्षाखाली अनुदानातुन भागविण्यात व खर्च करण्यात मंजुरी देय आहे.

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति

वेतन लिपीक कक्ष-१८( दोन प्रति ) पेन्शन लिनीक कक्ष-१६
राजपत्र लिपीक कक्ष-१४ यांना योग्य कार्यवाहिस्त्व.

प्रतः- जिल्हा कोषागार अधिकारी यांना माहितीस सादर

Ravi/300 Days Salendar

# भाग - ०४

# बक्षिस / मानधन

निरंक

# भाग - ०५

# शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती

क्र.: पोअय/कक्ष 12(1)/अं.आ. /पोशि/2452 राठोड/ 6003 /2025
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 09 JUN 2025

# अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि/२४५२ राठोड/७५९४/२०२४, दि. १३/०६/२०२४

**कसुरदाराचे नाव :- पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण**

---ooo---

तुम्ही **"पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण** तुमची दिनांक १४/०५/२०२४ रोजीचे रात्री २०/०० ते दि.१५/०५/२०२४ चे सकाळी ०८.०० वा पावेतो अति महत्वाची डायल ११२ करीता डयुटी नेमण्यात आली होती. परंतु तुम्ही वरिल अतिमहत्वाच्या डयुटीवर हजर झाले नाही. त्यामुळे डायल ११२ वरील आलेल्या महत्वाच्या कॉलला त्वरित रिस्पॉन्स देता आला नाही. तुमचे भ्रमणध्वनी क्र.७३५०२६२९३६ वर संपर्क करण्यासाठी कॉल केला असता तुम्ही कॉल उचलला नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण येथील इतर पोलीस अंमलदार हे अति महत्वाचे लोकसभा निवडणूक बंदोबस्ताकरीता जळगाव येथे गेले होते. तसेच पोलीस स्टेशनला गंभिर गुन्हयातील आरोपी अटकेत असूनही त्या ठिकाणी तुमची गार्ड डयुटी नेमण्यात आली होती. पोलीस स्टेशनला दैनंदिन कर्तव्याकरिता कर्मचारी अपुरे पडत असतांना तुम्ही आपल्या कर्तव्यावर अनधिकृतपणे गैरहजर राहीले. तुम्ही डायल ११२ चे अति महत्वाचे डयुटी करीता वेळेवर अनधिकृत गैरहजर राहील्याने तुमच्या जागेवर इतर कर्मचारी नेमण्यास अडचणी निर्माण झाल्या. सदर पोशि /२४५२ संतोष राठोड तुम्ही डायल ११२ MDT वरिल कॉल उचलत नसल्याबाबत नियंत्रण कक्ष यांनी सुध्दा फोनव्दारे कळवून सुध्दा तुम्ही दिनांक १४/०५/२०२४ रोजीचे रात्री २०/०० ते दि.१५/०५/२०२४ चे सकाळी ०८.०० वा पावेतो अनधिकृतपणे गैरहजर होते. त्यामुळे पोलीस स्टेशनला CCTNS ला साना.न.०४६/२०२४, दि.१४/०५/२०२४ चे २१.३१ वाजता तुमची गैरहजेरीबाबतची नोंद घेण्यात आली आहे.

तुम्ही पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, तुम्हाला नेहमी गैरहजर राहण्याचे सवय असल्याचे निदर्शनास येत आहे. तुमच्या या गैरहजर राहण्याच्या वृत्तीचा परिणाम इतर पोलीस अंमलदारावर होवून इतरांना अतिरिक्त कर्तव्य करण्याचा ताण पडत असतो. पोलीस स्टेशनला आलेल्या लोकांशी असभ्य व उध्दटपणे वागता. तुमचे सामान्य जनतेसोबत कोणतेही सौजन्याचे संबंध नसून त्यामुळे भविष्यात तुमच्या वागण्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो. तुमच्या या कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतीमा सामान्य जनतेमध्ये मलीन होत आहे. तुमचे हे कृत्य अत्यंत हलगर्जीपणा, बेशिस्त व बेजबाबदारपणा पोलीस खात्यात न शोभणारे आहे.

उपरोक्त प्रकरणी तुम्हाला या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि/२४५२ राठोड ७५९४/ २०२४, दि. १३/०६/२०२४ अन्वये **'पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येऊ नये ?'** या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस दि.०४/०७/२०२४ रोजी अदा करण्यात आलेली आहे. सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर केले नाही. तुम्ही केलेल्या कसुरी प्रकरणी बाजू मांडण्यासाठी तुम्हाला दि. ०६/०६/२०२५ रोजी आज्ञांकित कक्षात बोलावण्यात आले. तथापि तुम्ही सदर दिवशी गैरहजर राहीले. तुम्ही शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व अप्रामाणिकपणा केला आहे.

तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता ये नाही. करीता तुम्हाला तरी खालील प्रमाणे अंतिम आदेश देण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मुंब पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (५) मधील तरतुदीनुसार **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१ वर्षाकरीता (अपरिणामकारक ) रोखणे "** ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदे मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अ आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

कक्ष - 14

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण**

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद (व्दिप्रतीत)**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक/ कक्ष ९ (५)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक पो.अ.कार्या. यवतमाळ /प्रभारी अधिकारी, पो.स्टे. पुसद ग्रामिण यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष- ९(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र.: पोअय/कक्ष 12(1)/अं.आ. /पोशि/2452 राठोड/ 6062 /2025
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 09 JUN 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि/२४५२ राठोड/२२७/२०२५, दि. ०३/०१/२०२५

**कसुरदाराचे नाव :- पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण**

---ooo---

तुम्ही **पोकॉ/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण** तुम्ही दि. १८/११/२०२१ पासुन तैनातीस असुन जनरल डयुटी करत असतांना तुम्हाला पोलीस विभाग हा शिस्तीचे खाते असल्याबाबत जाणिव असुन सुद्धा तुम्ही कर्तव्यावर नेहमी गैरहजर राहता. तसेच कोणालाही न सांगता परस्पर डयुटीवरुन निघुन जाऊन गैरहजर राहण्याची तुम्हाला सवय आहे. तुमच्या अश्या बेशिस्त वागण्यामुळे तुम्हाला वारंवार गणणेत व वैयक्तिकरित्या वर्तणुक सुधारणेबाबत सुचना दिल्या. तुमच्या वर्तणुकीमध्ये सुधारणा होण्याकरिता तुम्हाला भरपूर संधी देण्यात आल्या. परंतु तुमचे वर्तणुकीमध्ये सुधारणा होत नसल्याने तुमचे गैरहजेरीत इतर अंमलदार नेमणेबाबत अडचण निर्माण होत आहे.

तुम्ही दि. २६/०८/२०२४ रोजी सकाळी ०८/०० ते १४/०० वा. पर्यंत vhf डयुटी लावण्यात आली होती. परंतु तुम्ही कर्तव्य टाळण्याचे उद्देशाने जाणुन बुजुन गैरहजर राहीले. तसेच दि. २८/०८/२०२४ रोजी २०/०० ते दि. २९/०८/२०२४ रोजी सेकाळी ०८/०० वा. Vhf डयुटी लावण्यात आली होती vhf डयुटीवरुन सदर अंमलदार हे कोणाला काही न सांगता परस्पर गैरहजर राहिल असल्याने तशी स्टे.डायरी ला नोंद घेण्यात आली.

तसेच आज दिनांक ०४/०९/२०२४ रोजी पो.स्टे.च्या पुरष लॉकअप मध्ये घरफोडी मधील एक आरोपी हवालबंद गार्ड पहाऱ्यावर तुमची डयुटी लावण्यात आली होती. तेव्हा प्रभारी अधिकारी यांनी पोलीस स्टेशनचे लॉकअप गार्ड चेक केले असता पोशि/२४५२ संतोष राठोड तुम्ही गैरहजर आढळुन आले. तेव्हा गार्ड अंमलदार पोहवा/२१५१ अनिल राठोड यांनी पोशि/२४५२ संतोष राठोड यांना फोनद्वारे माहिती देऊन पहाऱ्यावर येण्याबाबत सांगितले असता, त्यांनी **"मी डयुटीवर येत नाही, तुम्हाला काय करायचे असेल ते करा असे उद्धटपणाने बोलले"** त्यामुळे गार्ड अंमलदार यांनी आम्हाला माहिती दिल्याने दि. ०४/०९/२०२४ रोजी चे साना क्रमांक २५/२०२४ वेळ १८/२२ वा. स्टेशन डायरी नोंद घेण्यात आली. पोलीस अंमलदार पोशि/२४५२ संतोष राठोड तुम्ही अत्यंत महत्वाचे कर्तव्यावर असतांना सुद्धा तुम्ही कर्तव्य टाळण्याचे उद्देशाने जाणुन बुजुन गैरहजर राहीले आहे. तुमच्या ह्या वागणुकीमुळे इतर पोलीस अंमलदार यांचे वागणुकीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर अंमलदार हे कर्तव्यावरुन वारंवार गैरहजर राहतात. यापुर्वी त्यांचे अशा वर्तणुकीमुळे २ वर्षाची वेतनवाढ रोखण्याची शिक्षा का देण्यात येऊन नंये अशी कारणे दाखवा नोटीस आपले कार्यालयाकडुन प्राप्त झाली आहे. तसेच यापुर्वी २ दिवस गैरहजर असल्याने दोन दिवस बिन पगारी करण्यात आली होती. अशा शिक्षा मिळुन सुद्धा तुमचे वर्तणुकीमध्ये कोणतीही सुधारणा झाली नाही. तुम्ही वरिष्ठांची दिलेल्या आदेशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन त्यांनी नेमून दिलेल्या कर्तव्यस्थळी हजर मिळुन न आल्याने पेट्रोलींगकरीता आलेले सपोनि/माधव शिंदे यांनी दिनांक २६/१२/२०२३ रोजी स्टेशन डायरीत नोंद क्र.३०/२०२३ प्रमाणे तुमची गैरहजेरीची नोंद घेतली आहे. तुम्ही अवैद्य धंद्यावर जाणीवपूर्वक कार्यवाही न करता अवैद्य व्यवसाय करणारे व्यावसायीकांना पाठबळ देत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तुम्ही पोकॉ/२४५२ संतोष गोपा राठोड, तुम्हाला कर्तव्यावर नेहमी गैरहजर राहण्याची सवय असून तुम्हाला दारुचे व्यसन आहे. तुम्ही दारुच्या नशेत तुम्ही असभ्य वर्तन करित असता. तुम्ही दि. २६/०८/२०२४ रोजी सकाळी ०८/०० ते १४/००

वा. पर्यंत vhf डयुटी लावण्यात आली होती. परंतु तुम्ही कर्तव्य टाळण्याचे उद्देशाने जाणुन बुजुन गैरहजर राहीले. दिनांक ०४/०९/२०२४ रोजी पो.स्टे.च्या पुरष लॉकअप मध्ये घरफोडी मधील एक आरोपी हवालबंद गार्ड पहाऱ्यावर तुमची डयुटी लावण्यात आली असता प्रभारी अधिकारी यांनी पोलीस स्टेशनचे लॉकअप गार्ड चेक केले. तेव्हा तुम्ही सदर ठिकाणी गैरहजर आढळुन आले. तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाकडे जाणीवपूर्वक दुलर्क्ष करित असता. तसेच मद्य प्राशन करुन असभ्य वर्तन करणे, कर्तव्याप्रती उदासिनता, हलगर्जीपणा, निष्काळजीपणा अशा वर्तवणुकीमुळे तुमच्या या प्रवृतीचा विपरीत परिणाम इतर पोलीस अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी तुम्हाला या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि/२४५२ राठोड/२२७/२०२५, दि. ०३/०१/२०२५ अन्वये **'पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?'** या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस दि.१८/०१/२०२५ रोजी अदा करण्यात आलेली आहे. सदर कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर केले नाही. तुम्ही केलेल्या कसुरी प्रकरणी बाजू मांडण्यासाठी तुम्हाला दि. ०६/०६/२०२५ रोजी आज्ञांकित कक्षात बोलावण्यात आले. तथापि तुम्ही सदर दिवशी गैरहजर राहीले. तुम्ही शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व अप्रामाणिकपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता तुम्हाला तरी खालील प्रमाणे अंतिम आदेश देण्यात येत आहे.

**अंतिम आदेश**

कसुरदार **पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (५) मधील तरतुदीनुसार **" पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक ) रोखणे "** ही शिक्षा कायम करण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

(कुमार चिंता)
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**पोशि/२४५२ संतोष गोपा राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद ग्रामिण**

**मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद (व्दिप्रतीत)**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत** :- प्रमुख लिपीक/ कक्ष ९ (५)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक पो.अ.कार्या. यवतमाळ /प्रभारी अधिकारी, पो.स्टे. पुसद ग्रामिण यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष- ९(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र.पोअय/कक्ष 12(1)/अं.आ. /पोशि 2556 मंडाले/ 5998/2025
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 09 JUN 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२(१)/कादानो/२५५६ मंडाले/२३३७/२०२४, दि. ०१/०३/२०२४

**कसुरदाराचे नाव :- पोकॉ/२५५६ संदिप मंडाले तत्का. नेम. पो.स्टे., वणी सध्या. पो.स्टे. पुसद शहर**

---ooo---

तुम्ही **पोकॉ/२५५६ संदिप मंडाले, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर** येथे कार्यरत असुन दिनांक २६/१२/२०२३ रोजी तुमची सिंधी कॉलनी परिसरात दारु, जुगार केसेस करणे तसेच **अवैद्यरित्या जुगार चालणा-या ठिकाणी फिक्स पॉईट डयुटी लावण्यात आली असतांना तुम्ही फिक्स पॉईट डयुटीवर अनधिकृत गैरहजर होते.** त्यामुळे सिंधी कॉलनी परिसरातील उदय विलास लॉजच्या बाजुला अवैद्य व्यावसायीकांनी आपला अवैद्य जुगार खेळ सुरु केल्याबाबत ठाणेदारास गोपनीय बातमीदारांकडून माहिती प्राप्त झाल्याने तात्काळ डि.बी.पथकातील सपोनि/माधव शिंदे, पोना/२२८० पंकज उंबरकर, पोकॉ २४७९ विलास गेडाम, पोकॉ/२६५२ वसीम शेख, पोकॉ/४११ शाम राठोड यांना छापे कार्यवाहीकरिता सिंधी कॉलनी परिसरात रवाना केले. सदर पोलीस अधिकारी, अंमलदार यांनी सिंधी कॉलनी परिसरातील उदय विलास लॉजच्या बाजुला सुरु असलेल्या सार्वजनिक ठिकाणी छापे कार्यवाही करुन जुगार खेळविणारा नामे शाहरुक साहेब खान पठाण वय २९ वर्ष रा. रंगनाथ नगर वणी यास घटनास्थळीच पकडून त्यांचेकडून वरळी मटका साहित्य व नगदी १८३०/-रुपये पंचासमक्ष जप्त केले. पोकॉ/४११ शाम राठोड पो.स्टे.वणी यांचे फिर्यादिवरुन, आरोपी १) शाहरुक साहेब खान पठाण वय २९ वर्ष रा. रंगनाथ नगर वणी मटका मालक २) फहीमोद्दीन ताजोद्दीन वय ४८ वर्ष रा. विराणी टॉकिज जवळ वणी ता. वणी यांचेविरुध्द अपराध क्र.१४४३/२०२३ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम सहकलम १०९ भांदवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तुम्ही वरिष्ठांची दिलेल्या आदेशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन त्यांनी नेमून दिलेल्या कर्तव्य स्थळी हजर मिळुन न आल्याने पेट्रोलींगकरीता आलेले सपोनि/माधव शिंदे यांनी दिनांक २६/१२/२०२३ रोजी स्टे.डा. नोंद क्र.३०/२०२३ प्रमाणे तुमची गैरहजेरीची नोंद घेतली आहे. तुम्ही अवैद्य धंद्यावर जाणीवपूर्वक कार्यवाही न करता अवैद्य व्यवसाय करणारे व्यावसायीकांना पाठबळ देत असल्याचे निदर्शनास येत आहे.

तुम्ही कसुरदार **पोकॉ/२५५६ संदिप मंडाले, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर** यांना शिस्तप्रिय पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना वर नमुद प्रमाणे कसुरी केलेली आहे. तुम्ही वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करणे, कर्तव्याप्रती उदासिनता, हलगर्जीपणा, निष्काळजीपणा अशा वर्तवणुकीमुळे तुमच्या या प्रवृतीचा विपरीत परिणाम इतर पोलीस अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. करिता तुम्हाला खालीलप्रमाणे अंतीम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोकॉ/२५५६ संदिप मंडाले, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (५) मधील तरतुदीनुसार " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता (अपरिणामकारक ) रोखणे** " ही शिक्षा अंतिमतः कायम करण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

(कुमार चिंता )
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**पोकॉ/२५५६ संदिप मंडाले, नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर**

मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पुसद शहर (व्दिप्रतीत)

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक/ कक्ष ९ (५)/कक्ष १४/कक्ष १८/नोंदणी लिपीक, पो.अ.कार्या. यवतमाळ / ठाणेदार, पो.स्टे. वणी यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष- ९(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

5997

क्र.:पोअय/कक्ष 12(1)/ अं.आ./पोशि 2351 मेश्राम / /2025
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 09 JUN 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- कारणे दाखवा नोटीस क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि २३५१ मेश्राम/४८६०/२०२५, दि.०६/०५/२०२५

**कसुरदाराचे नाव :- पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम नेमणुक जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा**

---ooo---

पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम तुम्ही जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा येथे नेमणुकीस असून तुम्ही दि.१०/०२/२०२१ ते दि.०६/०८/२०२२ एकूण **५४२ दिवस** सिक रजेवर होते. त्यानंतर दि.०६/१०/२०२२ ते दि.२४/११/२०२२ **एकुण ४९ दिवस** सिक रजेवर होते. त्यानंतर दिनांक १७/१२/२०२२ ते दि.०३/०४/२०२३ **एकुण १०८ दिवस** तसेच दि.०५/११/२०२३ ते दि.२४/०४/२०२४ **एकुण १७२ दिवस** गैरहजर होते. यावरुन तुम्हास वैद्यकिय मंडळाकडे वरिष्ठांचे आदेशान्वये पाठविण्यात आले होते. सदर प्राप्त वैद्यकिय अहवालानुसार तुम्हाला दि.३०/०७/२०२४ रोजी कर्तव्यावर हजर करुन घेण्यात आले आहे. पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम तुम्ही नेहमीच गैरहजर व सीक रजेवर जाण्याचे सवईचे असल्याने तुमचा गैरहजर कसुरी अहवाल सहायक पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा यांनी या कार्यालयास सादर केल्याने पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम यांचे गैरहजर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने **पोशि/२३५१ सागर मेश्राम** हे सिक मध्ये राहण्याचे अधीन असून ते कर्तव्यावर सुध्दा वेळेवर हजर राहत नाही. त्यांच्या गैरहजेरीबाबत स्टे.डा.मध्ये वेळोवेळी नोंदी घेण्यात आलेल्या आहे. तुम्हाला दिलेले कर्तव्य पार पाडीत नाहीत. तसेच सदर अंमलदार तुम्ही कर्तव्यावर असतांना नशा पाणी करण्याची सवय आहे. त्यांना सदर बाबत वेळोवेळी समुदेशन करण्यात आले व त्यांना कर्तव्य निटपणे पार पाडण्याकरिता समक्ष अनेक वेळा सुचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु तुमच्यावर काहीही परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. वाहतूक नियंत्रण उपशाखेतील अंमलदारांचा थेट जनतेशी संबंध येत असल्याने व उपविभागामध्ये कोणत्याही वर्दळीचे ठिकाणी ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह मो.वा.का. केसेस करण्याचे मोहिमे दरम्यान एखादेवेळी कोणाशी वाद होवून कोणताही अनुचित प्रकार घडण्याची दाट शक्यता आहे. तसेच त्यांच्या या वर्तवणुकीमुळे पोलीसांची प्रतिमा सुध्दा खराब होण्याची दाट शक्यता आहे. सदर बाबींचा इतर अंमलदारांवर परिणाम होत आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाचे अभिलेखाची पडताळणी केली असुन त्यांचे सेवाकालावधीमध्ये खालील विवरणपत्रात नमुद प्रमाणे त्यांचा सिक कालावधी निश्चीत करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | वैद्यकिय कालावधी | दिवस | रजेचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | दि. १०/०२/२०२१ ते दि. ०६/०८/२०२२ | ५४२ दिवस | ५४२ दिवस विनावेतन रजा | क्र.२२०५४/२४, दि. १४/११/२०२४ |
| २. | दि. ०६/१०/२०२२ ते दि. २५/११/२०२२ | ५० दिवस | ५० दिवस परावर्तीत रजा | क्र. १३७९/२०२३, दि.२०/०२/२०२३ |
| ३. | दि. १७/१२/२०२२ ते दि.०३/०४/२०२३ | एकुण १०८ दिवस | (३६ दिवस बिनपगारी व ७२ दिवस अर्जित रजा) मंजूर | क्र. २८४०/२०२३, दि. ०३/०४/२०२२ |
| ४. | दि. ०५/११/२०२३ ते दि. २४/०४/२०२४ | १७२ दिवस | विनावेतन | क्र. २१९९६/२०२४ दि. १३/११/२०२४ |
| ५. | दि.२४/०४/२०२४ ते दि.२८/०७/२०२४ | ९५ दिवस | परावर्तीत रजा | |
| | **एकुण वैद्यकिय/गैरहजर कालावधी** | **एकुण ९६७ दिवस** | | |

**पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम नेमणुक जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा** यांचे सिक गैरहजेरीमुळे शासकिय डयुटी वाटपामध्ये अडचण निर्माण होवून ईतर पोलीस अंमलदार यांना जादा डयुटीचा अधिभार सहन करावा लागतो. त्यांचे वर्तन शिस्तीच्या पोलीस खात्यास अशोभणीय व बेजबाबदारपणाचे दिसून येते. त्यांचे गैरहजेरीचा परिणाम इतर पोलीस अंमलदारावर होवून ते सुध्दा त्यांचे अनुकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम** तुम्ही ९६७ दिवस सिक गैरहजर प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष १२(१)/प्राचौ/पोशि/२३५१ मेश्राम/ २२४७९/२०२४, दि.२८/११/२०२४ अन्वये प्राथमिक चौकशी आदेशीत करण्यात आली असून सदर चौकशी प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पांढरकवडा यांचेकडे देण्यात आली. प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पांढरकवडा यांना चौकशी करण्याकरिता प्राधिकृत करण्यात आले होते. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पांढरकवडा यांनी दिनांक १६/०४/२०२५ रोजी प्राथमिक चौकशी पुर्ण करुन अहवाल सादर केला.

त्याअनुषंगाने **पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम नेमणुक जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा** यांची उपरोक्त वर्तवणुक ही अत्यंत निष्काळजीपणाची व बेजबाबदारपणाची कर्तव्याप्रती उदासिनता दिसून येते. ते कर्तव्यात जाणीवपूर्वक गैरहजर राहण्याचे व सिकमध्ये राहण्याचे अधिन झाले आहे. ही अत्यंत गंभिर बाब आहे. पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम नेमणुक जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा यांची पोलीस दलात दिर्घकाळ सेवा झाली असून त्यांना कायद्याचे परिपूर्ण ज्ञान असतांना सुध्दा त्यांनी कर्तव्यात निष्काळजीपणा व बेजबाबदारपणाचे वर्तन केल्याचे दिसून आले आहे. तुमचा सिक रजा गैरहजेरीचा परिणाम इतर पोलीस अंमलदारावर होवून ते सुध्दा तुमचे अनुकरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तुमच्या या बेपर्वा, बेशिस्त, बेजबाबदार वर्तणुकीसाठी तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन, तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व गंभिर स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास येत आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता तुम्हाला खालील प्रमाणे प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे.

तुम्हाला वारंवार गैरहजर राहण्याची सवय असल्याचे दिसून येत आहे. तुमच्या या बेपर्वा, बेशिस्त, बेजबाबदार वर्तणुकीसाठी तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन, तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व गंभिर स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास येत आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्ष्यम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा केला आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर कर्मचा-यांवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात गैरहजर राहुन गैरवर्तन केले आहे. करीता तुम्हाला या कार्यालयाचे क्र.पोअय/कक्ष १२(१)/कादानो/पोशि २३५१ मेश्राम/४८६०/२०२५, दि.०६/०५/२०२५ नुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) का रोखण्यात येवु नये ?"** या प्रस्तावित शिक्षेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. तुम्ही कारणे दाखवा नोटीस दि.२१/०५/२०२५ रोजी स्विकारली असून तुम्ही स्पष्टीकरण दि.३०/०५/२०२५ रोजी या कार्यालयास सादर केले आहे. तसेच तुम्हाला अंतीम निर्णय घेण्यापुर्वी तुमचे कसुरी संबंधाने बाजु मांडण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोअय/कक्ष १२/कसुरी प्राचौ,विचौ/आज्ञांकित कक्ष/५९३५/२०२५, दि.०५/०६/२०२५ रोजी पत्राव्दारे दि. ०६/०६/२०२५ रोजी सकाळी ०९.३० वा कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले. तुम्हाला तुमचे म्हणणे मांडता यावे म्हणुन तुम्हाला आमचे समक्ष बोलावण्यात आले. तुम्ही आज्ञांकित कक्षात हजर राहुन तुम्हाला सतत गैरहजर राहण्याबाबतचे कारण विचारण्यात आले. तुम्हाला गैरहजर राहण्याचे संयुक्तीक कारण सांगता आले नाही. तुम्ही आमचे समक्ष आज्ञांकित कक्षामध्ये सादर केलेले मौखिक व लेखी स्पष्टीकरण असमाधानकारक दिसून आले आहे. तसेच प्राथमिक चौकशीमध्ये कसुरदार यांना गैरहजर राहण्याची सवय असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

कसुरदार **पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम नेमणुक जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा** यांना त्यांचेवरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२)(५) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता रोखणे (अपरिणामकारक) "** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा सोडुन गणण्यात येईल.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

**(कुमार चिंता)**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ**

**प्रति,**

**पोशि/२३५१ सागर दिलीपराव मेश्राम नेमणुक जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा**

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, जिल्हा वाहतूक नियंत्रण उपशाखा, पांढरकवडा (व्दिप्रतीत)**

२) सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-** प्रमुख लिपीक आस्थापना, कक्ष ९ (५)/कक्ष १४/कक्ष-१८/नोंदणी लिपीक, पो.अ.यवतमाळ यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना लिपीक (कक्ष ९(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

6098

क्र.: पोअय/कक्ष 12(1)/अं.आ./625 टेकाम+2556 मंडाले/ /2025
कार्यालय पोलीस अधीक्षक,यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 11 JUN 2025

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## अंतिम आदेश

**कारणे दाखवा नोटीस :** या कार्यालयाची कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष १२(१)/कादानो/६२५ टेकाम+२५५६ मंडाले/२९०१/२०२५, दि.०५/०३/२०२५

कसुरदाराचे नाव :- **१) पोकॉ/२५५६ संदिप मंडाले सध्या. पोलीस स्टेशन, पुसद शहर,**
**२) पोशि/६२५ विठ्ठल गोविंदा टेकाम, पो.स्टे. राळेगाव**

---ooo---

तुम्ही **१) पोशि/६२५ विठठल टेकाम २) पोका/२५५६ संदिप मंडाले**, वाहतुक नियंत्रण उपशाखा, वणी येथे कार्यरत कार्यरत असतांना त्यांचेविरुध्द तक्रारदार नामे श्री.रविंद्र धर्मराव कांबळे रा.वासेकर ले आउट वणी जि.यवतमाळ यांनी तक्रार अर्ज दिला. उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांनी सदर तक्रार अर्जाची चौकशी केली असुन सदर चौकशीनुसार दि.२१/३/२०२३ रोजी तक्रारदार श्री.रविंद्र धर्मराव कांबळे हे त्यांचे नातलगाचे अस्थी विसर्जनाकरीता वर्धा नदीवर पाटाळा पुल येथे जात असतांना तुम्ही तुमचे नेमण्यात आलेले डयुटी पॉईंट सोडुन पाटाळा पुलाजवळ तक्रारदार यांचे गाडीचे चालान केले आहे.

दि.२१/३/२०२३ रोजी पोशि/६२५ विठठल टेकाम तुमची टिळक चौक, वणी व पोका/२५५६ संदिप मंडाले तुमची गांधी चौक, वणी येथे वाहतुक नियंत्रण व मोटर वाहन कायद्याअंतर्गत केसेस करण्यासाठी डयुटी नेमण्यात आली होती. तुमची पाटाळा पुलाजवळ डयुटी नसतांना तुम्ही त्यांचे गाडीचे चालान केल्याने त्यांनी वरीष्ठ कार्यालयास तक्रार दिली आहे. तुमच्या अशा कृत्यामुळे पोलीस विभागाची प्रतिमा जनसामान्य लोकांमध्ये मलीन झालेली आहे.

तुम्ही तुम्हाला नेमण्यात आलेल्या डयुटी पॉईंटवर कर्तव्य बजावुन वाहतुक नियंत्रण करणे हे तुमचे कर्तव्य असतांना तुम्ही दि.२१/३/२०२३ रोजी वरीष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना किंवा माहिती न देता डयुटी पॉईंट सोडुन इतर ठिकाणी कर्तव्य बजावित असल्याचे चौकशीमध्ये निष्पन्न झाले आहे. तुम्हाला वरीष्ठांनी कर्तव्य व्यवस्थित पार पाडणेबाबत सुचना व निर्देश दिलेले असतांना तुम्ही वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व निर्देशाचे अवज्ञा करुन जाणिवपुर्वक दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येत आहे.

तुम्ही कसुरदार **१) पोकॉ/२५५६ संदिप मंडाले सध्या. पोलीस स्टेशन, पुसद शहर, २) पोशि/६२५ विठ्ठल गोविंदा टेकाम, पो.स्टे. राळेगाव** शिस्तप्रिय पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असुन तुमच्या अशा वागण्यामुळे शिस्तप्रिय अशा पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन होवुन पोलीस विभागाविषयी चुकीचा संदेश जाण्याची शक्यता आहे. तसेच तुमच्या या प्रवृत्तीचा विपरीतं परीणाम इतर पोलीस अंमलदार यांचेवर होवुन पोलीस खात्याचे शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उपरोक्त प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांनी त्यांचे पत्र क्र.१५३२/२०२३, दि. १९/०६/२०२३ अन्वये कसुरी अहवाल सादर केला आहे. सदर कसुरी प्रकरणी तुम्हाला कसुरी संबंधाने बाजू मांडण्याकरिता दि.०६/०६/२०२५ रोजी आज्ञांकित कक्षात बोलावण्यात आले. **१) पोकॉ/२५५६ संदिप मंडाले नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर,** तुम्ही कारणे दाखवा नोटीसचे स्पष्टीकरण सादर केले नाही तसेच तुम्ही आज्ञांकित कक्षात गैरहजर राहीले. **२) पोशि/६२५ विठ्ठल गोविंद टेकाम, पो.स्टे. राळेगाव** तुम्ही आज्ञांकित कक्षात उपस्थित राहिले तसेच तुम्ही कारणे दाखवा नोटीस उत्तर सादर केले असून

तुम्ही समक्ष आज्ञांकित कक्षामध्ये सादर केलेले मौखिक व लेखी स्पष्टीकरण असमाधानकारक दिसून आले आहे. सदर अहवालानुसार तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असुन तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, व गंभिर स्वरुपाचे असल्याचे निदर्शनास येत आहे. करिता तुम्हाला खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## अंतिम आदेश

१) कसुरदार **पोकॉ/२५५६ संदिप मंडाले** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (५) मधील तरतुदीनुसार " **पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक ) रोखणे** " ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा सोडुन गणण्यात येईल.

२) कसुरदार **पोशि/६२५ विठ्ठल गोविंदा टेकाम,** यांना त्यांचे वरील कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (४) मधील तरतुदीनुसार "**रु.५०००/-आर्थिक दंड** " ही शिक्षा देण्यात येत आहे.

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने आदेश मिळाल्याच्या दिनांकापासुन ६० दिवसाचे आत मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतित सादर करु शकता.

Kumar

कक्ष-14

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**१) पोकॉ/२५५६ संदिप मंडाले नेमणुक पोलीस स्टेशन, पुसद शहर,**

**२) पोशि/६२५ विठ्ठल गोविंदा टेकाम, नेमणुक पो.स्टे. राळेगाव**

**मार्फत :- १) प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, पुसद शहर (व्दिप्रतीत)**

**२) प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, राळेगाव**

२/- सदर अंतिम आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत :- प्रमुख लिपीक, आस्थापना/ कक्ष ९ (२)(५)/कक्ष १४/कक्ष १८/ नोंदणी लिपीक, पो.अ.कार्या.यवतमाळ/उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

३/- आस्थापना शाखा लिपीक कक्ष ९ (२)(५) यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस अंमलदार यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

क्र: पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आ/पोना-२२८० उंबरकर+गेडाम/६०४८/२०२
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 11 JUN 2025

## अंतिम आदेश

**संदर्भ** :- पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोना-२२८० उंबरकर+०१/४८१०/२०२५, दिनांक ०६/०५/२०२५.

**कसुरदाराचे नाव** :- १) पोना/२२८/० पंकज उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल गेडाम, तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी.

**थोडक्यात कसुरी** :- मटक्याचे खेळावर आकडे लावले व उधार झालेली एकुण रक्कम ३४,२२,०००/- ही देण्यास टाळाटाळ करुन खालील प्रमाणे कर्तव्यात कसुरी केल्याबाबत.

---ooo---

१) कसुरदार १) पोना/२२८० पंकज विठठलराव उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल सुनिलराव गेडाम, तुम्ही दोघे पोलीस स्टेशन वणी येथे गुन्हे शोध पथकामध्ये काम करीत असतांना तुम्ही अर्जदार श्री. शेख अल्ताफ शेख ताजुददीन शेख वय ५२ व्यवसाय घाऊक किराणा व्यापार, रा. विराणी टॉकीज जवळ, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ हे मोठया प्रमाणात किराणा मालाची खरेदी करुन वणी तालुक्यातील लहान किराणा दुकानदारांना ऑर्डरप्रमाणे पुरविण्याचे व्यापार करीत असुन त्यासोबत ते वणी शहरात चोरुन लपुन मटका व्यवसायाचा धंदा सुध्दा करतात. तुम्ही सन २०२३ मध्ये माहे डिसेंबर या महिन्यात अर्जदार यांना भेटले व "आम्हाला मटका लावायचा आहे परंतु पोलीस असल्याने दुसऱ्याकडे मटका लावु शकत नाही" असे म्हणाले तेव्हा अर्जदार यांनी "माझा लहान धंदा आहे तुमच्या एवढया रक्कमेचा मटका मी लावु शकत नाही" असे सांगीतले. तेव्हा तुम्ही अर्जदार यांना "तु आमचा मटका आंकडा घेवुन मोठया शेठकडे उतरत जा नाहीतर आम्ही तुला धंदा करु देणार नाही" असे म्हटल्यामुळे अर्जदार यांनी घाबरुन तुम्हाला होकार दिला. अशाप्रकारे तुम्ही तुमचे पदाचा गैरवापर केल्याचे निदर्शनास येत आहे.

२) कसुरदार १) पोना/२२८० पंकज विठठलराव उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल सुनिलराव गेडाम, तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी, तुम्ही तेव्हापासुन अर्जदार श्री. शेख अल्ताफ शेख ताजुददीन शेख यांचा मोबाईल क्र. ९७६७८९८७९७ चे व्हॉटस ॲपवर पंकज उंबरकर तुमचे मोबाईल क्र. ८६०५८९९०६१ वरुन व विशाल गेडाम तुमचे मोबाईल क्र. ७७२२०४१०३५ वरुन मटक्याचे आकडे मॅसेज करीत होते. अशाप्रकार मे २०२४ पर्यत पंकज उंबरकर तुम्ही १२,००,०००/- रुपये तर विशाल गेडाम तुम्ही २३,००,०००/- रुपये मटका आंकडा जिंकुन अर्जदार यांचेकडुन रक्कम घेवुन गेले आहात. सन २०२४ चे जुन महिन्याचे पहिल्या आठवडयात पंकज उंबरकर तुम्ही लावलेले ९,६८,०००/- रुपये व विशाल गेडाम तुम्ही मटका आकडयावर लावलेले २४,५४,०००/- हरले तेव्हापासुन तुम्ही दोघांनी अर्जदार यांचेशी मटका जुगार खेळण्याचे बंद केले.

३) कसुरदार १) पोना/२२८० पंकज विठठलराव उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल सुनिलराव गेडाम, तत्का. नेमणुक पो.स्टे. वणी, तुम्ही हरलेले ९,६८,०००/- रुपये व २४,५४,०००/- असे एकुण ३४,२२,०००/- हे अर्जदार यांना तुमचे कडुन घेणे असल्याने अर्जदार यांनी तुम्हाला वांरवार पैशाबाबत विचारणा केली असता, तुम्ही वांरवार अर्जदार यांना टाळण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी व्यथीत होऊन सदर प्रकरणाबाबत वरिष्ठांकडे तक्रार केली. तसेच अर्जदार यांना त्यांचे मित्राकडुन घेतलेली रक्कम परत दयायची असल्याने त्यांनी अर्जटमध्ये त्यांचे मालकीचे असलेले प्लॉटची स्वस्त दरामध्ये विक्री करावी लागली.

४) कसुरदार १) पोना/२२८० पंकज विठ्ठलराव उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल सुनिलराव गेडाम, तत्का.नेमणुक पो.स्टे. वणी, तुम्ही अर्जदार यांना त्यांचे मोबाईलवर व्हॉटसअप कॉल व संदेश पाठविलेले असुन २२ मार्च ते २२ जुलै २०२४ पर्यत टाईम बाजार, मिलन डे, कल्याण, मिलन नाईट या वरळी मटका नावाचे खेळावर मटक्याचे आकडे लावलेले व्हॉटसअप संदेश स्क्रीन शॉट वरुन दिसुन येत आहे. तसेच विभागीय चौकशीमध्ये तुम्ही तुमच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप हे तुम्हाला मान्य असल्याचे कबुल केले आहे. यावरुन तुम्ही महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग ०१ नियम क्रमांक ४०५ चा भंग करुन तुमचे कर्तव्यात कसुरी केल्याचे दिसुन येत आहे.

५) कसुरदार १) पोना/२२८० पंकज विठ्ठलराव उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल सुनिलराव गेडाम, तुम्ही पोलीस स्टेशन वणी येथे गुन्हे शोध पथकामध्ये काम करीत असुन सुध्दा तुम्ही अवैध व्यवसायाला आळा घालुन कायमस्वरुपी बंद करण्याची कारवाई न करता पदाचा गैरवापर करुन अवैध धंदयांना प्रोत्साहन देत असल्याचे वरिल बाबीवरुन निदर्शनास येत आहे. तुम्ही पोलीस विभागामध्ये पोलीस नाईक व पोलीस शिपाई या महत्वाचे पदावर कार्यरत असुन तुम्हाला कायदा व नियमांची माहिती असतांना सुध्दा तुम्ही कायदयाला न जुमानता अर्जदार यांचे मटक्याचे खेळावर आकडे लावले व त्यांचेकडे उधार झालेली एकुण रक्कम ३४,२२,०००/- ही देण्यास टाळाटाळ केली आहे. अशाप्रकारे तुम्ही अत्यंत बेशिस्त, बेजबाबदार व बपर्वा वर्तन केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच तुम्ही केलेल्या गैरकृत्याबाबत दैनिक वृत्तपत्र "साहसीक" मध्ये दिनांक ०५/१०/२०२४ रोजी "वणी येथील शेख अल्ताफ शेख ताजुददीन शेख यांची पोलीस स्टेशनच्या ०२ पोलीस कर्मचा-यांनी केली ३५ लाख रुपयांची फसवणुक" या मथळयाखाली बातमी प्रसिध्द झाली असुन सदर बातमीमुळे पोलीस दलाची प्रतिमा मलीन होण्यास तुम्ही कारणीभुत ठरले आहात.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/प्रा.चौ/पोना-२२८० उंबरकर+गेडाम/२०७९६/२०२४, दिनांक ०८/१०/२०२४ अन्वये प्रभारी अधिकारी पो.स्टे. मारेगाव यांना प्राथमिक चौकशी करणेबाबत आदेशीत करण्यात आले. सदर प्राथमिक चौकशीमध्ये तुमचेवर ठेवण्यात आलेले दोषारोप निष्पन्न होत असल्यामुळे या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/पोना-२२८० उंबरकर+०१/१३७५/२०२५, दिनांक २८/०१/२०२५ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली असुन पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. सदर विभागीय चौकशीमध्ये तुम्हास संपुर्ण संधी उपलब्ध करुन देण्यात येवुन पोलीस उप अधीक्षक (मुख्या) यवतमाळ यांनी दिनांक ११/०४/२०२५ रोजी विभागीय चौकशी पुर्ण करुन समारोप अहवाल सादर केला. सदर अहवालामध्ये तुम्ही केलेले कृत्य हे पोलीस खात्यास अशोभनिय, बेशिस्त व बेजबाबदारपणाचे तसेच तुम्ही कर्तव्यात अत्यंत गंभिर स्वरुपाचे गैरवर्तन केल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे तुम्हाला या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्र. पोअय/कक्ष-१२/वि.चौ/कादानो/पोना-२२८० उंबरकर+०१/४८१०/२०२५, दिनांक ०६/०५/२०२५ नुसार तुम्हास नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (१) (तिन) व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ मधील नियम क्र. ४३६ (II) (क) मधील तरतुदीनुसार "सेवेतुन बडतर्फ" (Dismiss From service) ही शिक्षा का देण्यात येवु नये? तसेच दिनांक ०८/१०/२०२४ ते दिनांक ०८/०२/२०२५ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा ( As Such) का गणण्यात येवु नये?" म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती. तुम्हाला दिनांक २२/०५/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस प्राप्त झाली व तुम्ही दिनांक २६/०५/२०२५ व २७/०५/२०२५ ला स्पष्टीकरण या कार्यालयास सादर केले. तसेच सदर कारणे दाखवा नोटीसचे अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेसंबधाने निर्णय घेणेकरीता तुम्हाला दिनांक ०६/०६/२०२५ ला आज्ञाकीत कक्षामध्ये बोलविण्यात आले असता तुम्ही आज्ञाकीत कक्षामध्ये हजर झालात. विभागीय चौकशीमध्ये तुमच्याविरुध्द ठेवण्यात आलेले दोषारोप हे पुर्णतः सिध्द होत असल्याने तसेच आज्ञांकीत कक्षामध्ये तुम्ही त्याबाबत कबुली दशविली. परंतु तुम्हाला सुधारण्याची संधी म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेल्या शिक्षेमध्ये बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

अंतिम आदेश

**कसुरदार १) पोना/२२८० पंकज विठठलराव उंबरकर, २) पोशि/२४७९ विशाल सुनिलराव गेडाम, तत्का.नेमणुक पो.स्टे. वणी, यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार "पुढील देय वार्षीक वेतनवाढ तिन (०३) वर्ष रोखणे (परिणामकारक)" शिक्षा देण्यात येत आहे. सदरची शिक्षा ही सर्व प्रकारच्या रजा धरुन व किरकोळ रजा वगळुन गणण्यात येईल. तसेच दिनांक ०८/१०/२०२४ ते ०८/०२/२०२५ पर्यतचा निलंबन कालावधी हा जसाचा तसा (As Such) म्हणुन गणण्यात येत आहे.**

सदर अंतिम आदेशानुसार देण्यात आलेली शिक्षा तुम्हास मान्य नसल्यास सदर शिक्षेबाबत तुम्ही विहीत मार्गाने मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे **६०** दिवसाचे आंत अपील करु शकतात.

**( कुमार चिंता )**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ**

**प्रति,**

**१) पोना/२२८० पंकज उंबरकर,**
**नेमणुक पो.स्टे. दारव्हा.**
**२) पोशि/२४७९ विशाल गेडाम,**
**नेमणुक पो.स्टे. महागाव.**

**मार्फत :- प्रभारी अधिकारी, पो.स्टे. दारव्हा/ पो.स्टे. महागाव. (व्दीप्रतीत)**
२/- सदर अंतिम आदेशाची मुळ प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

**प्रत :-उपविपोअ वणी/पोउपअधी(मुख्या) यवतमाळ/प्रभारी अधिकारी पो.स्टे. वणी/पो.स्टे. दारव्हा/पो.स्टे. महागाव/रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ/कक्ष-९/कक्ष-०९-०५/राजपत्र लिपीक (कक्ष-१४)/वेतन लिपीक(कक्ष-१८)/नोंदणी लिपीक,** यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस.

**प्रत :- कक्ष-०९-०५** यांनी सदर शिक्षेची नोंद नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापटात नोंदवुन त्यावर कार्यालय अधीक्षक यांची प्रतिस्वाक्षरी घेवुन त्याची छांयाकीत प्रत या शाखेस सादर करावी.

# भाग - ०६

# प्रशिक्षण व इतर

क्रमांक:पोअय/कक्ष-9(5)/सिक हजर/ 6085 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 11 JUN 2025

## आदेश

चाश्रेणीपोउनि/1175 निलेश विलासराव जेकब, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ हे दि.16/04/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 57 दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.11/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञाकिंत कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात येत आहे.
(त्यांचे रजा कालावधीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.)

( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये...)

( सुशिला पवार )
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,यवतमाळ करीता

प्रति,
पोलीस निरीक्षक,मोटर परिवहन विभाग,यवतमाळ
*2/- नमुद पोलीस अंमलदार आपले विभागात हजर झाले नंत्तर अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.*
प्रत :-कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव
प्रत:- चाश्रेणीपोउनि/1175 निलेश विलासराव जेकब, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ.

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)/सिक हजर/ 6080 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 11 JUN 2025

# आदेश

चापोहवा/1010 विजय माणिकराव केराम, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ हे दि.05/05/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 38 दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.11/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात येत आहे.

(त्यांचे रजा कालावधीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.)

( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये...)

( सुशिला पवार )
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,यवतमाळ करीता

प्रति,

पोलीस निरीक्षक,मोटर परिवहन विभाग,यवतमाळ

*2/- नमुद पोलीस अंमलदार आपले विभागात हजर झाले नंत्तर अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.*

प्रत :-कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव

प्रत:- चापोहवा/1010 विजय माणिकराव केराम, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ

क्रमांक:पोअय/कक्ष-9(5)/सिक हजर/ 6086 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 11 JUN 2025

## आदेश

चापोशि/1339 सचिन अनिल नारखेडे, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ हे दि.05/05/2025 ते दि.11/06/2025 पावेतो एकुण 38 दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत रजेवर होते. ते दि.11/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञाकिंत कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात येत आहे.
(त्यांचे रजा कालावधीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.)

( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये...)

( सुशिला पवार )
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,यवतमाळ करीता

प्रति,

पोलीस निरीक्षक,मोटर परिवहन विभाग,यवतमाळ

*2/- नमुद पोलीस अंमलदार आपले विभागात हजर झाले नंत्तर अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.*

प्रत :-कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव
प्रत:- चापोशि/1339 सचिन अनिल नारखेडे, नेमणुक-मो.प.वि यवतमाळ.

क्रमांक:पोअय/कक्ष-9(3)/सिक हजर/ 6120 /2025
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : 445001
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 12 JUN 2025

## आदेश

पोना/1046 प्रदिप सदाशिव पवार, नेमणुक-पोलीस मुख्यालय,यवतमाळ हे दि.26/02/2025 ते दि.12/06/2025 पावेतो एकुण 107 दिवस कर्तव्यावर वैद्यकिय कारणास्वत रजा गैरहजर होते. ते दि.12/06/2025 रोजी मा. पो.अ यांचे आज्ञांकित कक्षात हजर होणेकरीता आले असता हजर करुन घेण्यात येत आहे.
(त्यांचे रजा कालावधीबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येईल.)

( मा.पोलीस अधीक्षक यांचे आदेशान्वये...)

( सुशिला पवार )
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,यवतमाळ करीता

प्रति,

राखीव पोलीस निरीक्षक,पोलीस मुख्यालय,यवतमाळ.
*2/- नमुद पोलीस अंमलदार आपले विभागात हजर झाले नंत्तर अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.*
प्रत :- कक्ष-18 वेतन लिपिक/कक्ष-14 डिपीजी लिपिक यांना कार्यवाहीस्तव
प्रत:- पोना/1046 प्रदिप सदाशिव पवार, नेमणुक-पोलीस मुख्यालय,यवतमाळ